# दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

**मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४ ००१**

टेलिफोन ई.पी.बी.एक्स. २४५१६५१, २४५०६५२ ते ६५४, २४५१६५५

---

## सरळसेवा नोकर भरतीबाबतची विस्तृत जाहिरात १/२०१७

दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्त्याखाली असलेले सेवकमांडनुसारचे रिक्त पदे सरळसेवा पध्दतीने भरणेसाठी बँकेने दिनांक १०.६.२०१७ रोजीच्या दैनिक 'सकाळ' व 'लोकमत' या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून जाहिरातीतील पदे भरण्याकरीता बँकेस निवडसूची तयार करावयाची आहे. याकरीता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या अधिकृत www.ahmednagardccbexam.com या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

### १) प्रथम श्रेणी अधिकारी

मूळ वेतन श्रेणी रूपये - ५२५-३०-६४५-३५-८२०-४५-१०४५-५५-१३२०-६५-१६४५-७५-२०९५

| अ.नं. | श्रेणी | प्रवर्ग | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रवर्गातील इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम | अ.जा. | १ | - | - | १ |
| २ | | अ.ज. | १ | - | - | १ |
| ३ | | वि.जा.भ.ज.-अ | १ | - | - | १ |
| | | -ब | | - | - | |
| | | -क | | - | - | |
| | | -ड | | - | - | |
| ४ | | खुला | ४ | १ | १ | २ |
| | | एकूण | ७ | १ | १ | ५ |

### २) द्वितीय श्रेणी अधिकारी

मूळ वेतन श्रेणी रूपये - ४२५-२५-५२५-३०-६७५-३५-८५०-४५-१०७५-५०-१३२५-६०-१६८५

| अ.नं. | श्रेणी | प्रवर्ग | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | प्रवर्गातील इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | द्वितीय | अ.जा. | ८ | २ | १ | - | - | - | १ | ४ |
| २ | | अ.ज. | ४ | १ | १ | - | - | - | - | २ |
| ३ | | वि.जा.भ.ज.-अ | २ | १ | - | - | - | - | - | १ |
| | | -ब | २ | १ | - | - | - | - | - | १ |

The Ahmednagar District Central Co-op Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar

| अ.नं. | श्रेणी | प्रवर्ग | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | प्रवर्गातील इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | -क | ३ | १ | - | - | - | - | - | २ |
| | | -ड | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ४ | | वि.मा.प्र. | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ५ | | इ.मा.व. | १२ | ४ | २ | १ | - | १ | १ | ३ |
| ६ | | खुला | ३० | ९ | ५ | २ | १ | २ | ३ | ८ |
| | | एकूण | ६३ | १९ | ९ | ३ | १ | ३ | ५ | २३ |

## ३) ज्युनिअर ऑफिसर

मूळ वेतन श्रेणी रूपये - ३२५-२०-४०५-२५-५३०-३०-६८०-३५-८५५-४०-१०९५-५०-१३९५

| अ.नं. | श्रेणी | प्रवर्ग | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २ % | खेळाडू ५% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | प्रवर्गातील इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज्यु.ऑफि. | अ.जा. | ३१ | ९ | ५ | २ | १ | २ | ३ | ९ |
| २ | | अ.ज. | १६ | ५ | २ | १ | - | १ | २ | ५ |
| ३ | | वि.जा.भ.ज.-अ | ७ | २ | १ | - | - | - | १ | ३ |
| | | -ब | ६ | २ | १ | - | - | - | १ | २ |
| | | -क | ८ | २ | १ | - | - | - | १ | ४ |
| | | -ड | ५ | २ | १ | - | - | - | १ | १ |
| ४ | | वि.मा.प्र. | ५ | २ | १ | - | - | - | १ | १ |
| ५ | | इ.मा.व. | ४५ | १४ | ७ | २ | १ | २ | ५ | १४ |
| ६ | | खुला | ११३ | ३४ | १७ | ६ | २ | ६ | ११ | ३७ |
| | | एकूण | २३६ | ७२ | ३६ | ११ | ४ | ११ | २६ | ७६ |

## ४) क्लेरिकल -

मूळ वेतन श्रेणी रूपये - २१९-१३-२८४-१६-३६४-२०-५२४-२३-६८५-२५-७८५-३०-९९५

| अ.नं. | श्रेणी | प्रवर्ग | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | प्रवर्गातील इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्लेरिकल | अ.जा. | १९ | ६ | ३ | १ | - | १ | २ | ६ |
| २ | | अ.ज. | २० | ६ | ३ | १ | - | १ | २ | ७ |
| ३ | | वि.जा.भ.ज.-अ | - | - | - | - | - | - | - | - |
| | | -ब | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | -क | - | - | - | - | - | - | - | - |
| | | -ड | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | | वि.मा.प्र. | २ | १ | - | - | - | - | - | १ |
| ५ | | इ.मा.व. | - | - | - | - | - | - | - | - |
| ६ | | खुला | ११३ | ३४ | १७ | ६ | २ | ६ | ११ | ३७ |
| | | एकूण | १५५ | ४७ | २३ | ८ | २ | ८ | १५ | ५२ |

**अपंग आरक्षण : वरील पदांव्यतिरिक्त क्लेरिकल श्रेणीमध्ये ४ पदे अपंगांसाठी राखीव आहेत.**

The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd.
R.No.24910
Dt.3/10/1957
Head Office
Ahmednagar

टीप :

१) समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविण्यात आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदांपैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराद्वारे सदरचे पद भरले जाईल.

२) सदर पदांमध्ये कमी-जास्त बदल होण्याचा संभव आहे व याबद्दल उमेदवाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. हे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

३) उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदाला स्वतंत्र अर्ज व वेगळे परिक्षा शुल्क भरावे लागेल.

उमेदवारास बँकेच्या सेवेत कायम केल्यानंतर कायम सेवकाप्रमाणे पगार व भत्ते अदा केले जातील.

**५) शैक्षणिक पात्रता व अनुभव :**

उमेदवाराने खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव १०.६.२०१७ या दिनांकास प्रमाणपत्रासहित पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | श्रेणी | शैक्षणिक पात्रता | आवश्यक अनुभव | प्राधान्य |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम श्रेणी अधिकारी | कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर पदवीधर अथवा पदवीधर | बँकींग क्षेत्रातील अधिकारी पदाचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव (प्रमाणपत्र आवश्यक) | एमबीए/जेएआयआयबी/सीएआयआयबी/डीबीएम/एलएलबी/सी-पॅक प्रमाणित कोर्स/सीए/आयसीडब्ल्यूए/एम.बी.ए./एम.बी.ए.(फायनान्स)/एम.कॉम./बी.एससी (ॲग्री.)/एम.एससी (ॲग्री.)/संगणकावरील कामकाजाची माहिती |
| २ | द्वितीय श्रेणी अधिकारी | कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर पदवीधर अथवा पदवीधर | बँकींग क्षेत्रातील अधिकारी पदाचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव (प्रमाणपत्र आवश्यक) | एमबीए/जेएआयआयबी/सीएआयआयबी/डीबीएम/एलएल.बी/सी-पॅक प्रमाणित कोर्स/सीए/आयसीडब्ल्यूए/एम.बी.ए./एम.बी.ए.(फायनान्स)/एम.कॉम./बी.एससी (ॲग्री.)/ एम.एससी (ॲग्री.)/संगणकावरील कामकाजाची माहिती |
| ३ | ज्युनिअर ऑफिसर | कोणत्याही शाखेचा पदवीधर | - | जीडीसीॲण्डए/सी-पॅक प्रमाणित कोर्स/एचडीसीएम/जेएआयआयबी/सीएआयआयबी/बँकींग क्षेत्राचा अनुभव/पदव्युत्तर पदवी/संगणक कामकाजाची माहिती |
| ४ | क्लेरिकल | कोणत्याही शाखेचा पदवीधर | - | पदव्युत्तर पदवी/संगणकावरील कामकाजाची माहिती जीडीसीॲण्डए/एचडीसीएम/बँकिंग क्षेत्राचा अनुभव/वाणिज्य शाखा पदवीधर |

**६) वयोमर्यादा व शिथीलता :**

सरळसेवा भरतीसाठी सामाजिक व समांतर आरक्षणातील प्रवर्गनिहाय निर्धारीत केलेली कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे असेल. मात्र, वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक १०.६.२०१७ रोजीचे वय विचारात घेतले जाईल. तसेच सर्व संवर्ग व प्रवर्गासाठी किमान वयोमर्यादा २१ वर्षे पूर्ण राहील.

The Ahmednagar District Central Co-op Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar Ahmednagar

| अ.नं. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण वयोमर्यादा | समांतर आरक्षण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | अपंग माजी सैनिक | प्रकल्प/ भूकंप ग्रस्त | खेळाडू | अपंग | अंशकालीन पदवीधर बेरोजगार |
| १ | अनुसुचित जाती | ४३ | ४३ | ४५ | ४५ | ४३ | ४५ | ४६ |
| २ | अनुसुचित जमाती | ४३ | ४३ | ४५ | ४५ | ४३ | ४५ | ४६ |
| ३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती एकूण | ४३ | ४३ | ४५ | ४५ | ४३ | ४५ | ४६ |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग | ४३ | ४३ | ४५ | ४५ | ४३ | ४५ | ४६ |
| ५ | इतर मागासवर्ग | ४३ | ४३ | ४५ | ४५ | ४३ | ४५ | ४६ |
| ६ | खुला | ३८ | ३८ | ४५ | ४५ | ४३ | ४५ | ४६ |

टीप :

१) माजी सैनिकांसाठी वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्ष इतकी राहील.

२) शासकीय कर्मचारी/स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य/सन १९९१ चे जनगणना कर्मचारी आणि सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी शिथीलक्षम राहील.

उपरोक्त सामाजिक व समांतर आरक्षणामध्ये बँकेस काही श्रेणीमध्ये अनुभवी उमेदवार आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे श्रेणीनिहाय वरील कमाल वयोमर्यादेमध्ये अधिक शिथीलता देण्यात येत आहे.

| अ.नं. | श्रेणी | वयोमर्यादेमधील शिथीलता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | प्रथम | ५ वर्षे | अनुभव आवश्यक |
| २ | द्वितीय | ५ वर्षे | अनुभव आवश्यक |
| ३ | ज्युनिअर ऑफिसर | २ वर्षे | बँकींग क्षेत्रातील क्लेरिकल पदाचा किमान १ वर्ष इतका अनुभव धारण करत असल्यास |
| ४ | क्लेरिकल | २ वर्षे | बँकींग क्षेत्रातील क्लेरिकल पदाचा किमान १ वर्ष इतका अनुभव धारण करत असल्यास |

७) **परिविक्षाधिन कालावधी :**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधिन सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीमध्ये श्रेणीनिहाय खालीलप्रमाणे दरमहा संकलीत पगार देण्यात येईल.

अ) प्रथम श्रेणी रूपये १२०००/-

ब) द्वितीय श्रेणी रूपये १००००/-

क) ज्युनिअर ऑफिसर श्रेणी रूपये ८०००/-

ड) क्लेरिकल श्रेणी रूपये ६०००/-

The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar Ahmednagar

८) **निवड कार्यपध्दती :**

अ) लेखी परिक्षा -

सर्व श्रेणीतील पदांकरिता १०० गुणांपैकी ९०% गुणांसाठी लेखी परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. यामध्ये बँकिंग, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल.

ब) कागदपत्र पडताळणी -

उमेदवारास लेखी परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्राच्या प्राथमिक कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मात्र, याकरीता उमेदवारास लेखी परिक्षेत किमान ४०% गुण मिळविणे आवश्यक आहे.

प्राथमिक कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस बोलविले जाईल. या प्राथमिक कागदपत्र पडताळणीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास तो मुलाखतीस पात्र रहाणार नाही.

क) मुलाखत -

लेखी परिक्षेत यशस्वी होणा-या उमेदवारांना बँक धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात लेखी परिक्षेचे गुणानुक्रमे १०% गुणांसाठी मुलाखतीस बोलविण्यात येईल.

ड) उमेदवारांची अंतीम निवड सुची -

निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी अधिक लेखी परिक्षेतील गुण यांचे गुणानुक्रमे अंतीम निवड सूची तयार करण्यात येईल.

इ) उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहाणार नाही.

९) **पदांच्या निवडीसाठीची कार्यपध्दती, अटी, शर्ती :**

लेखी परिक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरीता अंतरिम स्वरूपात यादी जाहीर करण्यता येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल, अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता (तोंडी परिक्षा) करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवाराचे मागितलेले सामाजिक आणि/किंवा समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ.सारख्या सवलती नामंजुर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

**सर्वसाधारण अटी -**

१) उमेदवाराची लेखी परिक्षा प्रामुख्याने अहमदनगर शहरातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र आवश्यकतेनुसार जिल्ह्यातील इतर केंद्रांवर परिक्षा घेतली जाईल.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar

४) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरिता शारिरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) उमेदवारांना दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांचे आदेशास अधिन राहून बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसांचे आंत रूजू होणे आवश्यक राहील.

६) परिविक्षाधिन कालावधी (Probation Period) -निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधिन (प्रोबेशन) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीत उपरोक्त प्रमाणे श्रेणीनिहाय दरमहा संकलित वेतन देण्यात येईल. या कालावधीतील कामकाज व वर्तणूक विचारात घेऊन वेतनश्रेणी लागू केली जाईल.

७) नियुक्तीपूर्वी मूळशैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादिची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/नियुक्ती रद्द होईल.

**१०) ऑनलाईन अर्ज व लेखी परिक्षा शुल्क भरण्याची पध्दत :**

१) प्रस्तुत पदांकरीता फक्त बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.ahmednagardccbexam.com या अधिकृत संकेतस्थळावरून विहीत ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहाण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.ahmednagardccbexam.com या वेबसाईटद्वारे दिनांक १०.६.२०१७ ते दिनांक ३०.६.२०१७ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र/पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४) उमेदवाराची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या

The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar

गृहित पात्रतेनुसार कागदपत्रे पडताळणी करीता पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.ahmednagardccbexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६) संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर परिक्षा शुल्क चलनाची प्रिंट काढावी. किमान एका कार्यालयीन कामकाजाच्या एक दिवसानंतर पुढील कार्यालयीन दिवशी परिक्षा शुल्क दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कोणत्याही शाखेत/विस्तारकक्षात परिक्षा शुल्क चलनाद्वारे भरता येईल. परिक्षा शुल्क बँकेत भरल्यानंतर सदर चलनाच्या ३ प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत बँकेकडून परत मिळेल. सदर प्रतीची झेरॉक्स कॉपी उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी बँकेकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी/मुलाखत घेतली जाणार नाही. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक १३.६.२०१७ ते दिनांक ४.७.२०१७ असा राहील. या दिनांकानंतर बँकेत परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही.

७) परिक्षा शुल्क भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.ahmednagardccbexam.com या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर पाहता येऊ शकेल.

८) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चे अद्ययावत ३.५ सें.मी. X ४.५ सें.मी. आकारातील "JPG/JPEG/BMP" याप्रकारचे स्कॅन केलेले छायाचित्र (Photo) व पांढ-या स्वच्छ कागदावर काळ्या शाईच्या पेनने स्वत: स्वाक्षरी करून स्कॅन केलेली १.५ सें.मी. X ३.५ सें.मी. आकारातील "JPG/JPEG/BMP" प्रकारची स्वाक्षरी (Signature) स्कॅन करून www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.ahmednagardccbexam.com संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. (छायाचित्र व स्वाक्षरीच्या स्कॅन केलेले ईमेजची फाईल साईज १५० केबी पेक्षा जास्त नसावी. त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही)

९) ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

१०) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहती परिपूर्ण भरून विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रूपरेषा/वेळापत्रक/परिक्षा केंद्र/बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहाण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

११) अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे विहित प्रमाणपत्र असावे. अपंग उमेदवारास लेखी परिक्षेच्यावेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची परिक्षेची शुल्क रक्कम रूपये १००/- ही चलनाद्वारे परिक्षा शुल्कामध्ये वाढ करून त्याप्रमाणे भरावी लागेल व ती नापरतावा राहील. ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकिय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल.

१२) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात किंवा जिल्हा सैनिक बोर्ड यांचेकडे नावे नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच

The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar

प्रकल्पग्रस्त, अंशकालिन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१३) शासननिर्णय शालेय व क्रिडाविभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.३०.४.२००५ मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळांचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे असावे. खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरीता ज्या उमेदवारांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील तपासणी अहवालानंतरच त्यांची नेमणूक करण्यात येईल.

१४) अंशकालिन उमेदवारांनी, त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालिन काम केलेल्या पदवीधर/पदवीधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडे प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१५) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.

१६) भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी शासन नोकरी मिळणेबाबत सक्षम अधिकारी यांचे विहित प्रमाणपत्र सादर करणे आवश्क आहे.

१७) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्तजाती) भटक्या विमुक्त जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१.३.२०१७ नंतरचे/अद्ययावत (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्क आहे.

१८) ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र.८२/२००१/म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का.२,दि.२५.५.२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष २०१७-२०१८ या कालावधीकरीता वैध असलेले (अद्ययावत अर्थात दिनांक ३१.३.२०१७ नंतरचे वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबद्दलचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१९) विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

२०) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, ०१ जुलै २००५ नुसार विहित केलेल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.

२१) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न



The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar

करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखाद्या अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२२) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग क्र.१४/२०००/प्र.क्र.४३/व-१०, दि.२८ मे २००१ नुसार निवड झालेल्या अनुसूचित जमाती उमेदवाराला जातीवैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नेमणूकीचे आदेश पत्र देण्यात येईल.

२३) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्यासंदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडीअंती सादर करणे आवश्यक आहे.

जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक २५.८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

२४) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती रद्द करण्यात येईल व बँकेची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२५) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

२६) लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस/तोंडी परिक्षेस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२७) भरती प्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: त्यात बदल करणे, पदाच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार बँकेस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बँकेस राहील. याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

२८) लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी इ. करीता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेतस्थळावरूनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब, सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२९) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/माजी सैनिक यांनी समांतर आरक्षणाचा यापूर्वी लाभ घेतला असल्यास त्यांना पुन्हा या सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

**११) परिक्षा शुल्क :**

| श्रेणी | खुला प्रवर्ग रक्कम रूपये | मागासवर्गीय प्रवर्ग रक्कम रूपये |
|---|---|---|
| प्रथम | ८५०/- | ८००/- |
| द्वितीय | ८००/- | ७५०/- |
| ज्युनिअर ऑफिसर | ७५०/- | ७००/- |
| क्लेरिकल | ७००/- | ६५०/- |

The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R.No.24910 Dt.3/10/1957 Head Office Ahmednagar

सदर परिक्षा शुल्क हे नापरतवा राहील. श्रेणीनिहाय परिक्षा शुल्क दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कोणत्याही शाखेत/विस्तारकक्षात उपरोक्त संकेतस्थळावरून डाऊनलोड केलेल्या चलनाद्वारे भरावयाचे आहे. शुल्क भरण्याची अंतिम तारीख ४.७.२०१७ राहील याची नोंद घ्यावी.

टीप :

१) माजी सैनिक उमेदवारांना परिक्षा शुल्क नसल्याने भरण्याची आवश्यकता नाही.

२) परिक्षा शुल्क भरताना कोणतेही प्रोसेसिंग चार्जेस आकारले जाणार नाहीत.

विशेष सूचना -

१) या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करायची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.

२) अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी ७८८७८८२८९१, ७८८७८८२८९२ या भ्रमणध्वनीवर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.

ठिकाण : अहमदनगर मुख्य कार्यकारी अधिकारी चेअरमन

दिनांक :

R.No.24910
Dt.3/10/1957
Head Office
Ahmednagar